क) वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभांना हजर राहणे. भाग घेणे मतदान करणे.

ड) लाभांश मिळणे.

इ) संचालक मंडळाच्या निवडणूकीस उभे राहणे व मतदान करणे.

**२०) सभासदांची जबाबदारी :**

सभासदांनी घेतलेल्या भागांच्या रक्कमेइतकीच त्याची जबाबदारी मर्यादित राहील. माजी सभासदांची जबाबदारी ज्यावेळी त्यांचे सभासदत्व रद्द झाले त्यावेळेपासून दोन वर्षापर्यंत राहील. तसेच मयत सभासदांचे मालमत्तेवर त्याच्या जबाबदारीपोटी दोन वर्षापर्यंत बोजा राहील. तसेच सभासदांची जबाबदारी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीप्रमाणे राहिल.

**२१) सभासदांची ओळख : (के.वाय.सी.नॉर्मस् लागू करणेबाबत) :**

बँकेबरोबर होणाऱ्या सर्व व्यवहारांचे बाबतीत सभासदांची ओळख असणे आवश्यक आहे. सदर ओळखीसाठी सर्व व्यक्तीगत सभासदांनी रिझर्व्ह बँकेने लागू केलेल्या आपला ग्राहक जाणा (के.वाय.सी.) या मार्गदर्शक तत्वांची पुर्तता करणे आवश्यक आहे. सध्या असलेल्या सभासदांनी सुध्दा सदर बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. सभासदांची ओळख बँकेमधील अधिकारी किंवा अधिकृत अधिकारी करतील. यासाठी सभासदांना बँकेकडून पहिले एक ओळखपत्र नि:शुल्क दिले जाईल. ज्यावेळी सभासदास त्याचा कोणताही हक्क बजावयाचा असेल उदा. वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे व मतदान करणे, लाभांश पत्र घेणे, कर्जदार/जामिनदार म्हणून करार करणे, संचालक मंडळाच्या निवडणूकीत मतदान करणे इत्यादी किंवा अन्य कोणताही हक्क जो बँक वेळोवेळी प्रसिध्द करेल त्यावेळी हक्क बजावतांना ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील.

संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी भारताच्या निवडणूक आयोगाने निश्चित केलेले कोणतेही ओळखपत्र सादर करता येईल.

सभासदास ओळखपत्र सादर करणे अशक्य झाल्यास त्यावेळी त्या कारणापुरता त्याचा हक्क बँक नाकारु शकेल.

एखाद्या सभासदाचे ओळखपत्र हरविल्यास अथवा गहाळ झाल्यास बँकेकडून ओळखपत्राची डुप्लीकेट प्रत मिळेल तथापी अशा प्रतीस बँकेकडून रु.१००/- शुल्क आकारले जाईल.

**टीप** : सदर पोटनियमामध्ये अधिकृत अधिकारी म्हणजे बँकेने सदर कामकाजासाठी नेमलेली व्यक्ती/नेमलेल्या व्यक्ती होय.

**२२) सभासदत्वाचा राजीनामा देणे :**

१) सभासद आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देवून स्कवत:चे भाग भांडवल संचालक मंडळाचे संमतीने परत घेवू शकेल. परंतू तसे करण्यापुर्वी त्याचेकडे कर्ज व जामिनकीपोटी व मान्यतेपोटी येणे असलेल्या सर्व रक्कमांची परतफेड झाली असली पाहिजे.